शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद येथे स्थापित “राज्य कर्करोग संस्था” साठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री टाटा मेमोरियल संस्थेने निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेल्या पुरवठा आदेशावर खरेदी करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : यंखधो-२०१८/प्र.क्र.३९२/प्रशा-१

गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय,
९ वा मजला, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०८ मार्च, २०१९.

वाचा :
१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, क्रमांक राकसं-२०१६/प्र.क्र.४२४/प्रशा-१, दिनांक १५.१०.२०१६
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी २०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य- ८, दिनांक २६.०७.२०१७.

प्रस्तावना :

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेस उपरोक्त दिनांक १५.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये “राज्यस्तरीय कर्करोग संस्था” असा दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. सदर संस्थेस आवश्यक असणारी यंत्रसामुग्री केंद्र शासनाच्या अणुऊर्जा विभागाच्या सहायक अनुदानावर (Grant In Aid) कार्यरत असलेल्या टाटा मेमोरियल संस्थेने निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेल्या संबंधित यंत्रसामुग्री पुरवठा आदेशावर हाफकीन महामंडळामार्फत खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन होता.

शासन निर्णय :

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद येथे स्थापित "राज्य कर्करोग संस्था" करिता आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदीबाबत खालीलप्रमाणे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद येथे स्थापित “राज्य कर्करोग संस्था” साठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री केंद्र शासनाच्या अणुऊर्जा विभागाच्या सहायक अनुदानावर (Grant In Aid) कार्यरत असलेल्या टाटा मेमोरियल संस्थेने निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेल्या यंत्रसामुग्री पुरवठा आदेशावर हाफकीन महामंडळामार्फत खरेदी करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२) उपरोक्त “राज्य कर्करोग संस्था” साठी आवश्यक असलेली यंत्रसामुग्री टाटा मेमोरियल संस्थेच्या पुरवठा आदेशावर खरेदी करण्यापूर्वी, सदर यंत्रसामुग्री खरेदीबाबत हाफकीन महामंडळ स्तरावर विहीत निविदा प्रक्रिया राबवून कार्यवाही करावी किंवा टाटा मेमोरियल संस्थेने निश्चित केलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे करावी, याची गुणवत्तेनुसार तपासणी करावी. याबाबत सुयोग्य कारणमीमांसा हाफकीन महामंडळ स्तरावर गठीत खरेदी समितीच्या बैठकीत नमूद करावी. तद्नंतर प्रस्तावित यंत्रसामुग्री संदर्भात टाटा मेमोरियल संस्थेने विहीत निविदा प्रक्रिया पार पाडलेली आहे किंवा कसे, विभागाने खरेदीसाठी प्रस्तावित केलेली यंत्रसामुग्री व टाटा मेमोरियल संस्थेने खरेदी केलेल्या यंत्रसामुग्रीचे विनिर्दिष्ट्ये समान स्वरूपाचे आहेत किंवा कसे, तसेच आवश्यकतेनुसार अन्य बाबींची खातरजमा करावी त्यानंतर प्रस्तावित यंत्रसामुग्री टाटा मेमोरियल संस्थेने विहीत निविदा प्रक्रियेद्वारे निश्चित केलेल्या पुरवठा आदेशावर खरेदी करणेबाबत हाफकीन महामंडळाने पुढील कार्यवाही करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक १८/२०१९/व्यय-१३, दिनांक १६.०१.२०१९, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अनौपचारीक संदर्भ क्रमांक १५/१९/उद्योग-४, दिनांक २५.०२.२०१९ व सार्वजनिक आरोग्य विभाग अनौपचारीक संदर्भ क्रमांक ४/आ-८, दिनांक ०६.०२.२०१९ अन्वये दिलेले अभिप्राय व शासनाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१५४७४२५०१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2019.03.08 17:23:58 +05'30'

(अ.मु.डहाळे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
५) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
१०) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
११) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१२) सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) सर्व राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१५) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
१६) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्या., मुंबई.
१८) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१९) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२०) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय/आयुर्वेद/दंत महाविद्यालये व रुग्णालये.
२१) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
२२) निवड नस्ती (प्रशा-१)